26-05-2024-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 05/25/2024 11:57 PM Page 1

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



मांद्रे जुनसवाडा वनउद्यानात सुविधांची वानवा पान ३वर



चेपॉकवर कोण राज्य करणार? पान १० वर

वेर्णा, रविवार, २६ मे २०२४ | पाने १० | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 12, Issue 266 | Verna, | facebook.com/dainikherald Sunday 26 May, 2024 | Pages 10 | ₹ 4

## गुलमोहर

ऑनलाईन मायाजाल...

–पान ५

## निवडक

### छत्तीसगडमध्ये स्फोटात १० जणांचा मृत्यू

**बेमेतरा, दि. २५ :**

छत्तीसगडमधील बेमेतरा जिल्ह्यात गनपावडरच्या कारखान्यात मोठा स्फोट झाला आहे. या स्फोटात १० ते १२ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. ढिगाऱ्याखाली अनेक लोक दबले गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. बर्ला ब्लॉकच्या बोरसी गावात असलेल्या स्पेशल ब्लास्ट लिमिटेड गनपावडर कारखान्यात ही घटना घडली. कारखान्यात ८०० हून अधिक लोक काम करतात. सकाळी ६ ते ७ च्या दरम्यान हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. स्फोटानंतर कारखान्याभोवती लोकांची गर्दी झाली आहे. ७ जणांना रायपूरच्या मेहकरा रुग्णालयात आणण्यात आले असून त्यापैकी एकाचा मृत्यू झाला आहे. तेथे सहा जणांवर उपचार सुरू आहेत. याशिवाय अनेकांना रायपूर एम्स आणि जवळच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

### छत्तीसगडमध्ये चकमकीत दोन नक्षलवादी ठार

**रायपूर, दि. २५ :**

छत्तीसगडमधील जप्पेमार्का आणि कमकनारच्या जंगलात झालेल्या चकमकीत दोन नक्षलवादी ठार झाले. या परिसरात शोध मोहीम सुरु असल्याचे बिजापूर पोलिसांनी स्पष्ट केले आहे. जप्पेमाको आणि कमकनारच्या जंगलात पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. यामध्ये दोन नक्षली ठार झाले. घटनास्थळावरून शस्त्रे, वायरलेस सेट, स्टूज, माओवादी गणवेश, औषधे, प्रतिबंधित माओवादी संघटनेचे प्रचार साहित्य, साहित्य आणि इतर दैनंदिन वापराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

### केरळमध्ये मान्सूनपूर्व पावसाचा कहर

**बंगळुरू, दि. २५ :**

मोसमी पाऊस ३१ मे रोजी केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवलेला आहे. मोसमी वाऱ्याच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती असल्यामुळे मोसमी पाऊस केरळमध्ये वेळेत दाखल होणार असल्याचे भारतीय हवामान विभागाने काही दिवसांपूर्वी म्हटले होते. त्यानंतर आता केरळमध्ये मान्सूनपूर्व पाऊस दाखल झाला असून पावसामुळे अनेक सेवा विस्कळीत झाल्या आहेत. दक्षिण केरळवरील चक्रीवादळाच्या प्रभावाखाली केरळच्या किनारपट्टीपासून दक्षिणपूर्व अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने आयएमडीने पुढील दोन दिवस केरळमध्ये अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवलेला आहे.

### 'रेशल' पं. बंगालच्या किनाऱ्याकडे वाटचाल

**कोलकाता, दि. २५ :**

बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे रुपांतर रेमल चक्रीवादळात झाले आहे. तसेच हे वादळ रविवारी (२६ मे) पहाटे बांगलादेश आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर मुसळधार पाऊस आणि जोरदार वारे घेऊन येण्याची शक्यता आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे.आयएमडीच्या मते, चक्रीवादळ रेमाल उत्तरेकडे आणि नंतर पूर्वेकडे सरकून शनिवारी सकाळपर्यंत पूर्व–मध्य बंगालच्या उपसागरात तीव्र चक्रीवादळ बनले आहे.

### हवामान

कमाल : ३० किमान : २४

आर्द्रता : ८९

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,८३० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ९०,४०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७५,४१०.३९ ↓ (७.६५)

निफ्टी : २२,९५७.१० ↓ (१०.५५)

# मागण्या पूर्णत्वास नेण्यासाठी आंदोलन तीव्र करा

## मंत्री गोविंद गावडेंचे आदिवासी बांधवांना आवाहन

■ टीम दैनिक हेराल्ड :

**फोंडा, दि. २५ : आदिवासी समाजाच्या अनेक मागण्या सरकारदरबारी प्रलंबित आहेत. या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी आदिवासी बांधवांनी आपले आंदोलन अधिक तीव्र करण्याचे आवाहन क्रीडामंत्री गोविंद गावडे यांनी शनिवारी येथे केले. शासकीय पातळीवर आयोजित प्रेरणा दिन या कार्यक्रमाला मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते, असा सूरही त्यांनी यावेळी आवळला.**

येथील राजीव कला मंदिरात शनिवारी प्रेरणा दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दिलीप वेळीप व मंगेश गावकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ या कार्यक्रमाला उटाचे नेते उपस्थित होते.

मंत्री गावडे पुढे म्हणाले की, आदिवासींच्या कल्याणासाठी काहीही योगदान न दिलेले नेते आज युवकांची दिशाभूल करत आहेत. आदिवासी कल्याण खात्यातील काही अधिकाऱ्यांना आपण इशारा दिला असल्याचे ते म्हणाले. पुढील प्रेरणा दिनापूर्वी आदिवासी समाजाच्या मागण्या पूर्ण करणे शक्य झाले नाही तर त्यांनी आपले पद सोडावे, असे मंत्री गावडे म्हणाले.


अनुसूचित जमातीचा वापर केवळ राजकीय फायद्यासाठी केला जात असल्याचा आरोप करत, एसटी समाजाच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा उटा नेत्यांनी शनिवारी दिला. आदिवासी कल्याण संचालनालयातर्फे आयोजित प्रेरणा दिन कार्यक्रमाला मुख्यमंत्री उपस्थित न राहिल्याने उटाचे अध्यक्ष प्रकाश वेळीप यांनी यावेळी तीव्र नाराजी व्यक्त केली. पुढील विधानसभा अधिवेशनापूर्वी प्रलंबित मागण्या आणि एसटींसाठी राजकीय आरक्षणाचा मुद्दा निकाली काढला गेला पाहिजे. अन्यथा, गरज पडल्यास पुन्हा एकदा अधिक तीव्रतेने आंदोलन छेडणार, असा इशारा वेळीप यांनी दिला.

> **एसटी समाजाचा वापर केवळ राजकीय फायद्यासाठी केला जात असल्यास ते पूर्णपणे चुकीचे आहे. यामुळे आंदोलन अधिक तीव्र करण्यावाचून पर्याय नाही.**
>
> **–गोविंद गावडे,** *मंत्री*

सावर्ड्याचे आमदार गणेश गावकर यांनी सुद्धा एसटी समाजाच्या मागण्या प्रलंबित राहिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. उटा आंदोलनात सक्रिय सहभाग घेतलेल्यांनी आता या आंदोलनासाठी एकत्र येण्याची गरज आहे.

यावेळी एससी एसटी महामंडळ, आदिवासी आयोगाचे अधिकारी उपस्थित होते.

## सातेरी केळबाईचे मंदिर ४० वर्षांनंतर दृष्टीस



अंजुणे धरणामुळे पाण्याखाली गेलेल्या गुळे गावातील श्री सातेरी केळबाई मंदिराचे भग्नावशेष तब्बल ४० वर्षांनंतर दृष्टीस पडल्याने येथील एकेकाळच्या समृद्ध इतिहासाची झलक दिसून आली. धरणात बुडालेले गुळे गाव उन्हाळ्यात धरणातील पाण्याची पातळी खाली गेल्यानंतर थोड्या काळासाठी पुन्हा उभे राहते. (सगुण गावडे)

# कार – दुचाकी अपघातात बेतोड्यात एक ठार, एक गंभीर

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. २५ :** राज्यात अपघाती मृत्यूच्या घटना सुरू आहेत. काल राज्यात ३ विविध ठिकाणी झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला या घटना ताज्या असतानाच दुसऱ्याच दिवशी शनिवारी रात्री बेतोडा येथे कार व दुचाकी यांच्यात झालेल्या अपघातात एका युवकाचा (रात्री उशिरापर्यंत नाव समजू शकले नाही) मृत्यू झाला तर त्याच्यासोबत असलेला आशिद मकबूल मुजावर (२०, झरीवाडा – वास्को) हा युवक गंभीर जखमी झाला आहे. दुसरीकडे, पणसुले– धारबांदोडा येथे ट्रकने स्कूटरला धडक दिल्याने उन्नती गावडे (वांते – सत्तरी) ही युवती जखमी झाली.

प्राप्त माहितीनुसार, बेतोडा बगल रस्त्याचे रुंदीकरणाचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. शनिवारी संध्याकाळी रस्त्याचे काम सुरू असतानाच कार व दुचाकी यांच्यात टक्कर झाली. यात दुचाकीवरील युवक गंभीर जखमी झाले. जखमींना १०८ रुग्णवाहिकेतून उपजिल्हा इस्पितळात नेण्यात आले. पण उपचार सुरू असताना एकाचा मृत्यू झाला. तर गंभीर जखमी झालेल्या आशिद मकबूल मुजावर याला अधिक उपचारासाठी गोमेकॉत नेण्यात आले. अपघातात मृत्यू झालेल्या युवकांची ओळख पटविण्यात पोलिस रात्री उशिरापर्यंत व्यस्त होते. फोंडा पोलिसांनी अपघाताचा पंचनामा केला आहे. दुसऱ्या घटनेत पणसुले– धारबांदोडा येथे स्कूटर घेऊन युवती बगल रस्त्याने धारबांदोडा भागात जात होती. त्याचवेळी मागाहून येणाऱ्या ट्रकची धडक स्कू टरला बसली. यात उन्नती गावडे ही युवती गंभीर जखमी झाली. तिला त्वरित १०८ रुग्णवाहिकेतून पिळये प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. त्यानंतर अधिक उपचार करण्यासाठी जखमी झालेल्या युवतीला गोमेकॉत नेण्यात आले. फोंडा पोलिसांनी अपघाताचा पंचनामा केला आहे. फोंडा पोलिस स्थानकाच्या हद्दीत गुरुवारी बोरी, शुक्रवारी कुर्टी व पंचवाडी येथे प्रत्येकी एक तर शनिवारी बेतोडा येथील बगल रस्त्यावर अन्य एकाच मृत्यू झाला. परिसरात अपघाताची मालिका सुरू असल्याने परिसरात चर्चेचा विषय बनला आहे.



धारबांदोडा : पणसुले येथील स्कूटरला धडक दिलेला ट्रक.



## मच्छीमारांना इशारा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २५ :** राज्यात २५ ते ३१ मे दरम्यान तुरळक ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. मात्र या दरम्यान खात्याने कोणताही अलर्ट जारी केलेला नाही. २५ ते २८ मे दरम्यान वाऱ्याचा वेग ताशी ३५ ते ५५ किमीपर्यंत पोहोचण्याची शक्यता असल्याने मच्छीमारांनी समुद्रात उतरू नये, असे आवाहन खात्याने केले आहे.

शनिवारी पणजीतील कमाल तापमान १ अंशाने कमी होऊन ३२.६ अंश सेल्सिअस झाले, तर मुरगाव येथील कमाल तापमान ३३.६ अंश सेल्सिअस होते. पुढील सात दिवस कमाल तापमान ३३ ते ३५ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे.



# देशात सहाव्या टप्प्यात ५९.०६ टक्के मतदान

- **किरकोळ हिंसाचाराच्या घटना वगळता मतदान शांततेत**

**नवी दिल्ली, दि. २५ :**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात ७ राज्ये आणि १ केंद्रशासित प्रदेशातील ५८ जागांसाठी शनिवारी मतदान झाले. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी ५८ जागांवर ५९.०६ टक्के मतदान झाले. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७८.९९ टक्के आणि सर्वात कमी जम्मू आणि काश्मीरमध्ये ५१.४१ टक्के मतदान झाले. झारखंडमध्ये ६२.६६ टक्के मतदान तर ओडिसामध्ये ६० टक्केंच्या आसपास मतदान झाले. शेवटच्या ५६ जागांसाठी १ जून रोजी मतदान होणार आहे.

सहाव्या टप्प्यात सात राज्ये/केंद्रशासित प्रदेशातील ५८ मतदारसंघांमध्ये मतदान झाले. यात उत्तर प्रदेशातील १४, हरियानातील सर्व १०, पश्चिम बंगाल आणि बिहारमधील प्रत्येकी ८, दिल्लीतील सर्व ७, ओडिशातील ६, झारखंडमधील ४ तर जम्मू काश्मीरमधील एका जागेचा समावेश होता. यातही ५८ जागांसाठी ८८९ उमेदवार रिंगणात आहेत. लोकसभा निवडणुकीसोबत ओडिशा विधानसभेच्या ४२ जागांसाठीसुद्धा शनिवारी मतदान झाले.

पश्चिम बंगालमधील झारग्राममधील भाजप उमेदवार प्रणंत तुडू यांच्यावर हल्ला करण्यात आला. दगड लागल्याने त्याचा सुरक्षा रक्षक जखमी झाला. मतदारांना धमकावल्याची तक्रार मिळाल्यानंतर तुडू गडभेटा येथील एका बूथला भेट देत होते. प्रणत तुडू यांच्या गाडीचीही तोडफोड करण्यात आली आहे. भाजपने टीएमसीवर हल्ल्याचा आरोप केला आहे. पश्चिम बंगालमधील तमलूकमध्ये पान २ ▶

# 'कोकण रेल्वे'च्या रेंट–अ–बाइक व्यवसायाला विरोध

## मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करण्याची रेंट अ बाईक मालकांची मागणी | जागरूकता वाढविण्याचा निर्णय

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २५ :** कोकण रेल्वे महामंडळाच्या रेंट–अ–बाईक व्यवसायात उतरण्याच्या निर्णयाला रेंट ए बाइक मालकांनी तीव्र आक्षेप घेतला असून, शनिवारी बाणावली येथे झालेल्या बैठकीत आपल्या व्यवसायावरील संभाव्य परिणामांबद्दल चिंता व्यक्त केली. या समस्येबद्दल भागधारकांमध्ये जागरूकता वाढविण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. तसेच, आपल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे विषय नेण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. बाणावलीचे आमदार वेंझी व्हिएगस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला दक्षिण गोवा रेंट–अ–बाईक मालकांचे पदाधिकारी आणि इतर विविध भागधारक उपस्थित होते.

कोकण रेल्वे महामंडळाने विविध रेल्वे स्थानकांवर भाड्याच्या दुचाकी उपलब्ध करण्यासंदर्भात काढलेल्या निविदेला टॅक्सी मालकांसह सर्व रेंट–अ–बाईक मालकांनी विरोध दर्शवला असून, त्याचा एकत्रितपणे निषेध केला आहे. कोकण रेल्वे महामंडळाच्या या उपक्रमाला विरोध करण्यासाठी एकत्र येऊन प्रयत्न करण्याचा निर्णय यावेळी एकमताने घेण्यात आला. या प्रकरणी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून संबंधितांनी कोकण रेल्वेच्या पुढाकाराला एकत्रित विरोध करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. येत्या २६ मे रोजी उत्तर गोव्यातही असाच मेळावा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला, ज्यात उत्तर गोव्यातील रेंट–अ–बाईक मालकांना या विषयावर माहिती दिली जाईल, असे यावेळी सांगण्यात आले.

### गावपातळीवर जागृतीसाठी पथके स्थापन करणार

**गावपातळीवर या विषयाबाबत तसेच त्याच्या परिणामांबद्दल जनजागृती करण्यासाठी पथके स्थापन करण्याचा निर्णय बैठकीत एकमताने घेण्यात आला. गोव्यातील पर्यटनाचा स्थानिक जनतेला फायदा होत नसेल तर त्याचा काहीच उपयोग होत नाही, असे मत टॅक्सीमालक रॉक फर्नांडिस यांनी यावेळी व्यक्त केले.**



बाणावली : बैठकीला उपस्थित रेंट अ बाईक मालक व इतर.

> **सर्वप्रथम कोकण रेल्वेने काढलेली निविदा थांबवावी लागेल आणि त्यासाठी संबंधितांनी केंद्रीय मंत्र्यांशी संपर्क साधावा लागेल. या संदर्भात मुख्य सचिव आणि मुख्यमंत्री या दोघांनाही पत्रे लिहिण्यात आली आहेत. या निविदेमुळे रेंट अ बाईक व्यावसायिकांच्या पारंपरिक व्यवसायावर परिणाम होईल, अशी भीती भागधारक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मनात आहे. कोकण रेल्वेने स्थानिक भागधारकांशी संवाद साधला पाहिजे आणि पुढील मार्ग काढला पाहिजे.**
> **–वेंझी व्हिएगस, आमदार.**



# हंगामाच्या शेवटच्या आठवड्यात कळंगुट, कांदोळी पर्यटकांनी फुलले

- **किनाऱ्यांवर तोबा गर्दी**
- **प्रचंड वाहतूक कोंडी, पार्किंगचे तीनतेरा**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**कळंगुट, दि. २५ :** पावसाळ्यापूर्वी पर्यटन हंगामाच्या शेवटच्या आठवड्याअखेर शनिवारी कळंगुट–कांदोळी भागात पर्यटकांची तोबा गर्दी झाल्याचे आढळून आले. यामुळे समुद्रकिनारी सर्वत्र गोंधळ आणि वाहतूक कोंडी झाली होती. टॅक्सी, रेंट अ कार, बसगाड्या तसेच पर्यटकांची वाहने मोठ्या संख्येने अरुंद रस्त्यांवर अडकल्याचे दिसून आले. कळंगुट आणि बागा येथील सर्व पे–पार्किंगची जागा भरदुपारी भरल्याने आणखी वाहनांना जाण्यासाठी जागा नव्हती.

खचाखच भरलेल्या रस्त्यांमुळे स्थानिकांना बराच त्रास सहन करावा लागला. कळंगुट व परिसरात वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्याने सामान्य वेळेत आपल्या निवासस्थानी किंवा व्यावसायिक आस्थापनांमध्ये ये–जा करणे स्थानिकांना अक्षरशः अशक्य झाल्याची तक्रार यावेळी रहिवाशांनी केली. तसेच तातडीच्या वैद्यकीय मदतीची गरज असलेले रुग्णही अडकून पडले होते. कळंगुट मार्केट, बागा सर्कल आणि सेंट अँथनी चॅपल येथील प्रमुख पान २ ▶